NAAC Accredited-२०२२
'B++ Grade (CGPA ३.९६)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११६ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, eligibility@sus.ac.in


## पात्रता विभाग

जा.क्रं.पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२३-२४/1242 दिनांक : 8 JUN 2023

**प्रति**

**मा. प्राचार्य / संचालक**

सर्व संलग्नित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, आर्किटेक्चर एम.बी.ए., विधी,
शिक्षणशास्त्र व एम.सी.ए. अभ्यासक्रमाची महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ

**विषय :** **तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई यांच्या अंतिम पात्रता याद्या जमा करण्याबाबत. . .**

**संदर्भ :** पात्रता विभागाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२३-२४/८८२ दि.२७/०४/२०२३

**महोदय,**

शै. वर्ष २०२२-२३ मध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून विद्यार्थी पात्रतेच्या पडताळणी केलेल्या याद्या पात्रता कार्यवाहीसाठी तात्काळ सादर करण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले होते.

तथापि अद्याप काही महाविद्यालयांकडून याद्या या कार्यालयाकडे सादर केले नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव विद्यार्थ्यांची पात्रता झालेली नाही व यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. पात्रते अभावी विद्यार्थ्यांना गुणपत्रिकाही प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास येत आहे व यामुळे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करतेवेळी अडचणी निर्माण होत आहेत.

यास्तव पुनःश्च या पत्राव्दारे कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून त्यांची पात्रताबाबत संबंधित प्राधिकरणाकडे संपर्क साधून पात्रता संदर्भात पाठपुरावा करावा व संबंधितांकडून प्राप्त पात्रता यादी तात्काळ या कार्यालयाकडे सादर करावयात, जेणेकरुन विद्यार्थ्यांची पात्रता त्वरीत केली जाईल व त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. तसेच संबंधित प्रवेश नियामक प्राधिकरणाचे प्रवेश मान्यता याद्या सादर न केल्याने व याअनुषंगाने विद्यार्थ्यांची अंतिम पात्रता न झाल्यास, त्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस व कायदेशी कारवाई विद्यार्थ्याकडून उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी आपली संस्था / महाविद्यालय जबाबदार असेल याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

**आपला स्नेहांकित,**

**(डॉ. गणपूर शिवकुमार)**
**संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ**